N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** सिंधखेड राजा
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0050 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**05/03/2024 23:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Date From (दिनांक पासून):** 05/03/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/03/2024
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Time From (वेळेपासून):** 10:57 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:24 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 05/03/2024 **Time (वेळ):** 23:31 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 027
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 05/03/2024 23:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 6 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** मेहकर ते जालना रोड वरील , सावखेड तेजन फाटा ,ता सिंदखेडराजा जि बुलढाणा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** कैलास नारायण काकडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वडाळी,सिंदखेडराजा,सिंधखेड राजा,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वडाळी,सिंदखेडराजा,सिंधखेड राजा,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | किरण केसापुरे | | | 1. ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, , चिखली ,सिंधखेड राजा, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | गजानन आबाराव इप्पर | | | 1. जळगाव ता सिंदखेडराजा , सिंदखेडराजा,सिंधखेड राजा, बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 3 | राजेश तुकाराम जायभाये | | | 1. पागरखेड,सिंदखेडराजा,सिंधखेड राजा,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा दिनांक 05.03.2024
कैलास नारायण काकडे, वय 32, व्यवसाय शेती, रा. वडाळी ता. सिंदखेडराजा, जि. बुलडाणा मो क्रमांक 8766502872.

मी समक्ष टंकलिखीत फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन वर नमुद ठिकाणी कुटुंबासह राहतो व शेतीचा व्यवसाय करतो. मी गेल्या तिन ते साडेतिन वर्षापासून ग्रामपंचायत वडाळी येथे ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत आहे.

मी दिनांक 01.03.2024 रोजी श्रीमती शितल घोगरे, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा यांना फोनव्दारे माहिती दिली की, मी गेल्या तिन ते साडेतिन वर्षापासून ग्रामपंचायत वडाळी येथे ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत आहे. तसेच आमचे वडाळी गावचे सांडपाणी व घनकचरा व्यवस्थान कार्यक्रम सन 2022-2023 यासाठी आमचे ग्रामपंचायतीसाठी स्वच्छ भारत मिशन अंतर्गत जिल्हा परिषद बुलढाणा यांचेकडून 70 टक्के रक्कम व 15 व्या वित्त आयोगानुसार ग्रामपंचायती कडून 30 टक्के रक्कम असे एकूण 403664/- रुपयांची प्रशासकिय मान्यता भेटलेली आहे. त्यानुसार ग्रामपंचायत वडाळी येथे सांडपाणी व घनकचऱ्याबाबत कामे केलेली आहेत. सदर केलेल्या कामावर ग्रामपंचायत वडाळीचे वतीने मी देखरेख तसेच बिलांचे इतर प्रकियेबाबत कामे पाहत आहे.

वरिलप्रमाणे ग्रामपंचायत स्तरावर सांडपाणी व घनकचऱ्यांचे केलेल्या कामाचे 3,88,254/- रुपयांचे बिल काढण्यासाठी उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, चिखली/प्रभार सिंदखेडराजा यांचा कार्यपुर्णत्वाचा दाखला आवश्यक असून सदर कार्यपुर्णत्वाचा दाखला देण्यासाठी कंत्राटी कर्मचारी श्री. इप्पर साहेब हे स्वतः करिता 2000/- रुपये व उपअभियंता श्री. चव्हाण साहेब तसेच शाखा अभियंता श्री. केसापूरे साहेब यांचेकरिता एकूण बिलाचे 5 टक्याप्रमाणे 20,000/- रुपये असे एकूण 22,000/- रुपये लाचेची मागणी करित असल्याबाबत माहिती दिली.

त्यावरुन दिनांक 01.03.2024 रोजी राज्य उत्पादन शुल्क कार्यालय बुलढाणा यांचे कार्यालयातील दोन शासकीय कर्मचारी पंच म्हणुन उपलब्ध करुन घेवुन पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम, सापळा पथक तसेच दोन्ही पंच असे शासकिय वाहणाने सिंदखेडराजा येथील जिजाऊ सृष्टी येथे हजर आले. त्यावेळी मी सुध्दा ठरल्याप्रमाणे कार्यवाही पथकाजवळ हजर आलो. त्यावेळी पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम यांनी मला त्यांचा तसेच कार्यवाही पथकातील सदस्यांचा व पंचाचा परीचय करुन दिला. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम यांनी माझी वरीलप्रमाणे लेखी तकार नोंद करुन घेतली. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम यांनी मला व पंचाना पडताळणी कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती दिली. त्याबाबत सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा करण्यात आला आहे.

त्यानंतर मी दिलेल्या तकारीनुसार यातील कंत्राटी कर्मचारी श्री. इप्पर यांची लाच मागणी पडताळणी कार्यवाही करणे
असल्याने श्रीमती घोगरे मॅडम यांनी दिलेल्या सुचनेनुसार मी कंत्राटी कर्मचारी श्री. इप्पर यांना फोन केला व
भेटण्यासाठी कोठे येवू याबाबत विचारणा केली असता श्री इप्पर साहेब यांनी मला सिंदखेडराजा पासून जवळच
असलेल्या खामगांव खापरखुटी येथे भेटण्यासाठी बोलाविल्याने आपण सर्वानुमते कंत्राटी कर्मचारी इप्पर यांची ग्राम
खामगांव खापरखुटी, ता. सिंदखेडराजा येथे लाच मागणी पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले त्यानुसार
पोउपअधि. श्रीमती घोगरे मॅडम यांनी व्हॉईस रेकार्डर चालू करुन नापोकॉ. लोखंडे यांचे करवी शर्टाचे आतून बाहेरुन
दिसणार नाही अश्याप्रकारे लटकावून दिले व पंच क. 1 श्री. प्रमोद पिपळे यांचेसह माझी खाजगी मोटार सायकलने
14.43 वा ग्राम खामगांव खापरखुटी गावाकडे रवाना केले. त्यावेळी मी व पंच असे आम्ही दोघे माझी मोटार
सायकलने खामगांव खापरखुटी येथे जावून कंत्राटी कर्मचारी श्री. इप्पर साहेब यांची भेट घेतली त्यावेळी त्यांचे सोबत
ग्राम पागरखेड येथिल श्री राजेश जायभाये हे सुध्दा त्यांचे सोबत होते. त्यावेळी मी, इप्पर साहेब यांचेशी पंच कमांक
1 श्री. पिपळे यांचेसमक्ष आमचे ग्राम बडाळी येथील साडपाणी व धनकचऱ्याचे केलेल्या कामाचे कार्यपुर्णत्वाचे
दाखल्या संबंधाने बोलणी केली असता त्यावेळी आमची बोलणी चालु असताना ग्राम पागरखेड येथील श्री. राजेश
जायभाये म्हणाले की, मग डेप्युटी इंजिनिअर ची सही लागती न तेच्यावर अन मग तिथं ते ठरलेलं असतं त्यायच ते
देवुन टाकायचं अन मोकळ व्हायच पटकन एकाच मिनीटात या कामात ठरेल असतं त्यायच कटकट देवुन टाकायच
मोकळ होवुन जायच त्यावेळी मी इप्पर साहेब यांना म्हणालो की, आमचं म्हणणं ये की त्यायन किती सांगीतले ते,
किती सांगीतले विस का काय? त्यावेळी इप्पर साहेब मला म्हणाल की, टक्केवारी ठरेल असती त्यायची एकोणविस
हजार चारशे रुपये झाले यायचे. त्यावेळी राजेश जायभाये म्हणाले की, एकोणविस हजार रुपये दयायचे. त्यावेळी मी
इप्पर साहेब यांना म्हणालो की, पंधरा हजार देतो बाप्पा मी, दोघायला, ते चव्हाण साहेबाला अन केसापूरे साहेबाला,
त्यावेळी मला इप्पर साहेब म्हणाले की, महे दोन हजार रुपये देवुन टाकरान का नंतर निघल्यावर? असे म्हणून
माझेकडे कंत्राटी कर्मचारी श्री. इप्पर साहेब यांनी उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग,
चिखली/प्रभार सिंदखेडराजा यांचा कार्यपुर्णत्वाचा दाखला देण्यासाठी उपअभियंता श्री चव्हाण साहेब तसेच शाखा
अभियंता श्री. केसापूरे साहेब यांचेकरिता तडजोडीअंती 15,000/- रुपये व स्वतः करिता 2000/- रुपये व असे
एकुण 17,000/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच पागरखेड येथील राजेश जायभाये यांनी मला कंत्राटी कर्मचारी
श्री. इप्पर तसेच ग्रामीण पाणी पुरवठा, जि. प. उपविभाग चिखली/प्रभार सिंदखेडराजा येथील उपअभियंता श्री
चव्हाण साहेब व शाखा अभियंता श्री. केसापूरे यांना लाच रक्कम दयावी म्हणून प्रोत्साहित केले त्यावेळी मी त्यांना
पैश्याची व्यवस्था करुन तुम्हाला भेटतो असे सांगून पंच क 1 श्री पिपळे तसेच मी असे कार्यवाही पथकाजवळ परत
आलो. त्यावेळी पोउपअधि श्रीमती घोगरे मॅडम यांनी माझेत व कंत्राटी कर्मचारी श्री इप्पर यांचेत लाच मागणी
पडताळणी कार्यवाही दरम्यान ध्वनीमुद्रीत झालेले सभाषण ऐकुन कंत्राटी कर्मचारी श्री इप्पर यांनी उपविभागीय
अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, चिखली/प्रभार सिंदखेडराजा यांचा कार्यपुर्णत्वाचा दाखला देण्यासाठी
उपअभियंता श्री. चव्हाण साहेब तसेच शाखा अभियंता श्री. केसापूरे साहेब यांचेकरिता तडजोडीअंती 15,000/-
रुपये व स्वतः करिता 2000/- रुपये व असे एकुण 17,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम
स्विकारण्यास संमती दिली असल्याबाबत खात्री केली.

त्यानंतर सदर प्रकरणात उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, चिखली/प्रभार सिंदखेडराजा येथील
उपअभियंता श्री. चव्हाण साहेब तसेच शाखा अभियंता श्री. केसापूरे साहेब यांची कंत्राटी कर्मचारी इप्पर यांनी
केलेल्या लाच मागणी संमती आहे काय? याबाबत पडताळणी कार्यवाही करुन खात्री करणे असल्याने व दिनांक
02.03.2024 व दिनांक 03.03.2024 रोजी शासकिय सुट्टी असल्याने दिनांक 04.03.2024 रोजी ग्रामीण
पाणीपुरवठा उपविभाग, चिखली येथे उपअभियंता श्री. चव्हाण साहेब तसेच शाखा अभियंता श्री.केसापूरे साहेब यांची
पडताळणी कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार घोगरे मॅडम यांनी मला दिनांक
04.03.2024 रोजी चिखली येथे हजर राहण्याबाबत सुचना दिल्या. त्यानुसार दिनांक 04.03.2024 रोजी
ठरल्याप्रमाणे पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम व सापळा पथक तसेच दोन्ही पंच असे चिखली येथील एम
आय डि.सी. परिसरात हजर आहे. मी सुध्दा घोगरे मॅडम यांचे सुचनेप्रमाणे कार्यवाही पथकाजवळ हजर आलो.
त्यानुसार दिनांक 01.03.2024 रोजी कंत्राटी कर्मचारी श्री. इप्पर यांचे लाच मागणी नुसार यातील उपअभियंता
श्री. चव्हाण साहेब व केसापूरे साहेब यांची त्यांचे ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग चिखली येथील कार्यालयात भेट
घेवून इप्पर यांचे लाच मागणीस संमती आहे काय? याबाबत पडताळणी करणे असल्याने घोगरे मॅडम यांनी मला
पडताळणी पुर्व पंचनाम्यातील सुचनाची उजळणी करुन दिली. त्यानुसार पोउपअधि. श्रीमती घोगरे मॅडम यांनी
व्हॉईस रेकार्डर चालू करुन नापोको लोखंडे यांचे करवी शर्टाचे आतून बाहेरुन दिसणार नाही अश्याप्रकारे लटकावून

दिले व पंच क. 1 श्री. प्रमोद पिंपळे यांचेसह माझे खाजगी मोटार सायकलने 11.59 वा. ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, चिखली येथे रवाना करण्यात आले. त्यावेळी मी पंच व 1 श्री. पिंपळे असे चिखली येथील ग्रामीण पाणी पुरवठा कार्यालयात जावून तेथे हजर असलेल्या एका इसमाकडे चव्हाण साहेब व केसापूरे साहेब यांचेबाबत विचारणा केली असता त्यांनी बाहेर गेल्याबाबत सांगीतल्याने मी माझे फोनवरुन केसापूरे साहेब यांना फोन करुन ग्राम बडाळी येथील सांडपाणी व घनकचऱ्याचे कार्यपुर्णत्वाचे दाखल्यासंबंधाने बोलणी केली असता झालेल्या बोलणी दरम्यान मी त्यांना म्हणालो की, त ते आपले इप्पर साहेबानं फोन केलता ते म्हणु लागले की आपल ते, त्यावेळी केसापुरे साहेब म्हणाले की, काही आहे बाकी तुम्ही ते गजाननलाच विचारुन घ्यायचं असत ना काय आहे काय त, त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, अहो त्यायल विचारल पण ते सांगु राहिले दोन टक्के, चव्हाण साहेबांचे दोन टक्के, त्यावेळी केसापुरे साहेब म्हणाले की, बर ठिक आहे, एक काम करा तुम्ही ते वाघमारे साहेबांचे इच्याहुन फोन लावा मला, असे म्हटल्याने मी त्यांचे कार्यालयातील वाघमारे साहेब यांचे फोनवरुन स्पीकर ऑन करुन पंचासमक्ष बोलणी केली असता लोकसेवक केसापूरे साहेब मला म्हणाले की, गजानन न सांगीतल बरोबर सांगीतल काही अडचण नाही तिच्यात पाहुन घ्या तुमच्या हिशोबानं तुम्हाले काही वाटल त. बर तुम्ही एक काम करा एक दोन घटयानं तुम्ही एक दोन घटयानं या मी वापस येतांना भेटन तुम्हाले आता, असे म्हणून लोकसेवक केसापुरे यांनी मला दोन तासानंतर परत भेटीस बोलाविल्याने मी व पंच क 2 श्री पिंपळे असे कार्यवाही पथकाजवळ परत आलो. त्यावेळी घोगरे मॅडम, सापळा पथक तसेच पंचानी सदर संभाषण ऐकून लोकसेवक श्री. केसापूरे यांनी मला प्रत्यक्ष भेटण्यासाठी बोलाविल्याची खात्री केली. त्यानंतर लोकसेवक श्री. केसापुरे हे दोन तासानंतर भेटणार असल्याने काही वेळ वाट पाहून परत लोकसेवक श्री. केसापुरे यांची लाच मागणी पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर लोकसेवक श्री. केसापूरे हे ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग चिखली येथील कार्यालयात हजर असल्याबाबत खात्री करुन पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम यांनी माझेकडे व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन नापोकॉ लोखंडे यांचे करवी गळयामध्ये शर्टाचे आतून, बाहेरुन दिसणार नाही अश्या पध्दतीने लटकावून देवून मला व पंच क 2 श्री पिंपळे यांना माझे खाजगी मोटार सायकलने 16.19 वा रवाना केले. त्यावेळी मी व पंच क 1 श्री. पिंपळे असे चिखली येथील ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयात जावून लोकसेवक श्री केसापुरे, शाखा अभियंता यांची भेट घेतली व त्यांचेशी ग्राम बडाळी येथील सांडपाणी व घनकचऱ्याचे कार्यपुर्णत्वाचे दाखल्यासंबंधाने बोलणी केली. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, नाही ते.... गजानन भाऊ आहेन म्हणजे एकोनाबीस हजार चारशे रुपये सांगीतले होते, त्यावेळी केसापुरे साहेब म्हणाले की, तुमचं बिल किती झाल, त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, तीन अठठयाशीच बिल आहे न. त्यावेळी केसापुरे साहेब मला म्हणाले की, काहीच नाही (तकारदाराला उददेशुन) तुम्हाल काय दयायचं देवुन टाका किती झाली तीन झाले का नाही, दहा, बारा, बारा हजार देवुन टाका असे म्हणून तुम्ही त्याच्याकडं देवुन दया मी साहेबाल सांगतो सही होवुन जाते, त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, का साहेबाल बोलाव का, चव्हाण साहेबाला, त्यावेळी केसापुरे साहेब मला म्हणाले की, नाही बोलायच काम नाही असे म्हणून लोकसेवक श्री. केसापुरे साहेब यांनी मला पंच क 1 श्री. पिंपळे यांचे समक्ष स्वतः करिता तसेच उपविभागीय अभियंता यांचेकरिता तडजोडीअंती 12,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम कंत्राटी कर्मचारी श्री. गजानन इप्पर यांचेकडे देण्या

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Bramhadev Sakharam Shelke(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

देण्यास सांगीतल्याने मी व पंच क्र १ असे कार्यवाही पथकाजवळ परत आलो. यावेळी पोउपअधि श्रीमती घोगरे मॅडम यांनी माझेत व लोकसेवक श्री. केसापुरे यांचेत लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण लोकसेवक श्री. केसापुरे यांची तडजोडीअंती १२०००/— रुपये लाच मागणी करुन लाच रक्कम कंत्राटी कर्मचारी श्री. गजानन इप्पर यांचेकडे देण्याबाबत खात्री केली. व सदर प्रकरणात दिनांक ०५.०३.२०२४ रोजी सिंदखेडराजा येथे जावून पुढील सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानुसार सदर प्रकरणात आज दिनांक ०५.०३.२०२४ रोजी सापळा कार्यवाही आयोजित करणे असल्याने श्रीमती घोगरे मॅडम, सापळा पथक, दोन्ही पंच असे त्यांचे कार्यालयाचे शासकिय वाहनाने सापळा कार्यवाही कामी लागणारे सर्व साहित्यासह सिंदखेडराजा शिवारात पोहचले. त्यावेळी मी सुध्दा ठरल्याप्रमाणे कार्यवाही पथकाजवळ हजर आलो. त्यावेळी घोगरे मॅडम यांनी लोकसेवक श्री केसापुरे यांचे तडजोडीअंती १२,०००/— रुपये लाचमागणी प्रमाणे तसेच कंत्राटी कर्मचारी श्री इप्पर यांनी स्वत:करिता मागीतलेले २०००/— रुपये असे एकूण १४,०००/— रुपये हजर करण्यास सांगीतले असता मी माझेजवळील ५००/— रुपये दराच्या २८ भारतीय चलनातील नोटा असे एकूण १४,०००/—रुपये श्रीमती घोगरे मॅडम यांचेकडे हजर केले. त्यावेळी घोगरे मॅडम यांनी सापळा पथकातील सदस्यांचे मदतीने सदर नोटांचे क्रमांक लिहून घेवून त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रक्रिया पुर्ण करुन सदर लाच रक्कम माझे शर्टाचे डाव्या बाजूच्या खिश्यात ठेवून देवून मला व पंचाना सापळा पुर्व पंचनाम्याप्रमाणे सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर घोगरे मॅडम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी कंत्राटी कर्मचारी श्री गजानन इप्पर यांना लाचेची रक्कम घेवून कोठे येवू याबाबत विचारणा केली असता कंत्राटी कर्मचारी श्री. इप्पर मला म्हणाले की, ११.०० वा दरम्यान तुम्ही सावखेड तेजन फाटयावर या असे सांगीतले. त्यानुसार सदर प्रकरणात सिंदखेडराजा येथून थोडयाच अंतरावर असलेल्या सावखेड तेजन फाटयावर सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे ठरविण्यात आले. त्याबाबतचा सविस्तर सापळा पुर्व पंचनामा करण्यात आला आहे. त्यानुसार घोगरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन नापोकॉ. लोखंडे यांचे करवी माझे गळयात लटकावून दिले. त्यानंतर मला व पंच क्र १ श्री. पिपळे यांना माझे खाजगी मोटार सायकलने मेहकर ते जालना रोडवर असलेल्या सावखेड तेजन फाटयाकडे १०.५७ वा. रवाना केले. त्यावेळी आमचे मागोमाग घोगरे मॅडम तसेच सापळा पथक व पंच क्र २ श्री. देशमुख असे शासकिय वाहनाने सावखेड तेजन फाटयाकडे रवाना झाले. त्यानंतर मी व पंच क्र १ असे सावखेड तेजन फाटयाकडे जात असतांना मला कंत्राटी कर्मचारी इप्पर यांचा फोन आला व त्यांनी मला ते थोडयाच वेळात सावखेड तेजन फाटयावर पोहचत असल्याबाबत सांगीतले. त्यानंतर आम्ही सर्वजन सावखेड तेजन फाटयावर पोहचल्यानंतर घोगरे मॅडम व सापळा पथक असे शासकिय वाहनातुन उतरुन सावखेड तेजन फाटयाचे आजुबाजुला आपआपले अस्तित्व लपवुन उभे राहीले. त्यावेळी मी व पंच क्र. १ श्री. पिपळे असे सावखेड तेजन फाटयावर असलेल्या एका चहा नाष्टयाचे हॉटेलवर थांबून राहीलो. त्यानंतर लगेच कंत्राटी कर्मचारी श्री. इप्पर हे त्यांचे खाजगी मोटार सायकलने सावखेड तेजन फाटयावर आल्यावर मी त्यांना चहा घेण्यासाठी बोलाविले असता इप्पर साहेब हे सुध्दा चहा नाष्टयाचे हॉटेलमध्ये येवून माझेजवळ बसले. त्यावेळी आमच्यात ग्राम वडाळी येथील सांडपाणी व घनकचऱ्याचे कार्यपुर्णत्वाचे दाखल्यासंबधाने बोलणी झाली. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, बारा मधी म्हणी साहेब केसापुरे साहेब म्हणी जाऊ दया दे म्हणी कस तुम्ही आता, ते म्हणु लागले जाऊ दया म्हणी बारा मधी करुन टाकतो म्हणी त्याच्याकड देवुन टाका म्हणी, तुमचे दोन दयावच लागल का? त्यावेळी इप्पर साहेब म्हणाले की, बघा बुवा तुमची काय तयारी......पण मी घेत असतो कोणाकडुन, कोणाकडुन म्हणजे बाकीच्या कडुन घेतोच मी असे म्हणून हाताचे बोटे हलवून पैसे देण्याबाबत इशारा केला असता, मी माझे शर्टाचे डाव्या बाजूच्या खिश्यात ठेवून दिलेली लाचेची रक्कम १४,०००/— रुपये माझे उजव्या हाताने बाहेर काढून कंत्राटी कर्मचारी श्री. इप्पर साहेब यांचेसमोर धरली असता इप्पर साहेब यांनी सदर लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे नेसल्या पॅन्टच्या उजव्या

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

FIR प्रत मिळाली

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Bramhadev Sakhara

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

बाजुचे खिश्यात ठेवून दिले. त्यावेळी मी माझे हातातील मोटार सायकलची चावी हातातून खाली टाकून परत उचलून लाच रक्कम स्विकारल्याबाबत नियोजित इशारा केला असता, पोउपअधि. श्रीमती घोगरे मॅडम व सापळा पथकातील सदस्य असे आमचे जवळ आले व त्यांनी कंत्राटी कर्मचारी श्री इप्पर यांना माझेकडून लाच रक्कम स्विकारले प्रकरणी ताब्यात घेवून इप्पर साहेब यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. गजानन आबाराव इप्पर, वय २७ वर्ष, व्यवसाय नोकरी, ( कंत्राटी क्षेत्र पर्यवेक्षक) जलजिवन मिशन, रा. जळगांव, ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा असे सांगीतले. त्यानंतर झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

आरोपी क्र १ श्री. किरण केसापुरे, शाखा अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, चिखली/प्रभार सिंदखेडराजा यांनी मला दिनांक ०४.०३.२०२४ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान तडजोडीअंती ग्राम वडाळी येथील सांडपाणी व घनकचऱ्याचे व्यवस्थापनाचे केलेल्या कामाचे मोजमापे करुन मोजमाप पुस्तीकेत नोंदी घेतल्याबाबतचा मोबदला म्हणून स्वत:करिता तसेच उपअभियंता ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग चिखली/प्रभार सिंदखेडराजा यांची कामपुर्णत्वाचे दाखल्यावर सही घेवून देण्याकरिता १२,०००/—रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम कंत्राटी कर्मचारी गजानन इप्पर यांचेकडे देण्यास सांगून कंत्राटी कर्मचारी गजानन इप्पर यांना लाच रक्कम स्विकारण्यास प्रोत्साहित केले.

आरोपी क्र. २ श्री. गजानन आबाराव इप्पर, वय २६ वर्ष, पद कंत्राटी क्षेत्र पर्यवेक्षक, जलजिवन मिशन यांनी मला दिनांक ०१.०३.२०२४ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान स्वत:चे वैयक्तीक प्रभावाने ग्राम वडाळी येथील सांडपाणी व घनकचऱ्याचे व्यवस्थापनाचे केलेल्या कामाचा कामपुर्णत्वाचे दाखला देण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, चिखली/प्रभार सिंदखेडराजा येथील उपअभियंता चव्हाण साहेब व शाखा अभियंता श्री. किरण केसापूरे यांचेकरिता तडजोडीअंती १५०००/— रुपये व स्वत:करिता २०००/—रुपये असे एकूण १७०००/—रुपये लाचमागणी केली. तसेच दिनांक ०५.०३.२०२४ रोजी १०.५७ ते ११.२४ वा. दरम्यान मेहकर ते जालना रोडवरील सावखेड तेजन फाटा, ता. सिंदखेडराजा येथे करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र १ केसापूरे यांनी दिनांक ०४.०३.२०२४ रोजीचे केलेल्या लाचमागणी प्रमाणे १२,०००/—रुपये व स्वत:चे २०००/—रुपये असे एकूण १४,०००/—रुपये स्विकारले.

आरोपी क्र ३ श्री. राजेश तुकाराम जायभाये,रा. पांगरखेड, ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा (खाजगी इसम) यांनी दिनांक ०१.०३.२०२४ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान मला मी. ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, चिखली/प्रभार सिंदखेडराजा उपअभियंता चव्हाण साहेब व शाखा अभियंता श्री. किरण केसापूरे यांना तसेच कंत्राटी कर्मचारी श्री इप्पर यांना लाच रक्कम दयावी म्हणून प्रोत्साहित केलेले आहे.

तरी **आरोपी क्र १** श्री. किरण केसापुरे, शाखा अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, चिखली/प्रभार सिंदखेडराजा, **आरोपी क्र. २** श्री. गजानन आबाराव इप्पर, वय २६ वर्ष, पद कंत्राटी क्षेत्र पर्यवेक्षक, जलजिवन मिशन, **आरोपी क्र ३** श्री. राजेश तुकाराम जायभाये,रा. पांगरखेड, ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा (खाजगी इसम) यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद देत आहे.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीख/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(से. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)